

# जडते हे नाते

निर्मित आणि निर्मात्याचे
जडते तव नाते रे नित्याचे
पाहसी जगी तू सर्वत्राला
मनात सजवित चित्र तयाचे

जेथे बघशील तू रे तेथे
विश्वची अवघे तवसंगे गाते
काल आज आणि उद्याही
सूर अभंगीत मनी निनादे

द्वैतरुप जीवनात तुझ्या ह्या
आत्मियता भरविते माया
सुखवी तुज आंतरिक किमया
अद्वैती भिजविता काया

जीवन निर्झर खळखळ वाहे
फुलवीत फुले. . .ती ब्रह्मा वाहे
चंद्र, सूर्य, तारांगण सारे
उदयीत नित्य हदयी तू पाहे

विजय पाठारे